गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा.क्र./गो.वि.ग./म.वि.वि.वि./1582/२०२६ दि. 17/११/२०२६

परिपत्रक

विषय:- दि. 02 नोव्हेंबर 2026 ते 20 नोव्हेंबर 2026 या कालावधीत शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) निबंध आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्याबाबत.

संदर्भ:- मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र./साशा/कार्या-१२/टे-१/निवड/२०२६/६७४ दि. ०६/११/२०२६

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोग आणि मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त निर्देशान्वये भावी व नवमतदारांमध्ये निवडणूका व मतदानाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) व्दारे निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा दिनांक 02 नोव्हेंबर 2026 ते 20 नोव्हेंबर 2026 या कालावधीत आयोजित करावयाच्या आहेत. सदर स्पर्धेचे स्वरुप व विषय संदर्भीय पत्रामध्ये दिलेले आहे.

करीता संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन मा. प्राचार्य यांनी महाविद्यालयीन स्तरावर निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा दिनांक 02 नोव्हेंबर 2026 ते 20 नोव्हेंबर 2026 या कालावधीत आयोजित करावे. जेणेकरुन भावी व नवमतदारांमध्ये निवडणूका व मतदानाविषयी जागरुकता निर्माण करण्यास मदत होईल.

सहपत्र:- संदर्भीय पत्र संलग्नित.

मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने,

(श्री. दिनेश नरोटे)
सहायक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -
१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालय

चंद्रपूर रेल्वे स्टेशन चे समोर, ता. चंद्रपूर, जि. चंद्रपूर, 442401

E-mail: dydeochandrapur@gmail.com दूरध्वनी क्र. 07172-256589

क्र. सशा/कार्या-12/ट-1/निवड/2026/674 दिनांक ०६ नोव्हेंबर, 2026

प्रति,

1. कुलसचीव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 3853 दि. 12/11/2026
जावक क्र. 4353 दि. 12/11/26

विषय : 02 नोव्हेंबर 2026 ते 20 नोव्हेंबर 2026 या कालावधीत शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) द्वारे निबंध आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्याबाबत.

संदर्भ : 1. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. ईएलसी-2026 / प्र. क्र. 58 / निवडणूक-5, दिनांक 05.11.2026
2. मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. 491 / SVEEP-I / ELC-Comp / 2026, दिनांक 30.10.2026

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मा. भारत निवडणूक आयोग आणि मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये भावी व नवमतदारांमध्ये निवडणुका व मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) द्वारे निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर स्पर्धा दिनांक 02.11.2026 ते 20.11.2026 या कालावधीत आयोजित करावयाच्या आहेत. स्पर्धेचे स्वरूप व विषय खालीलप्रमाणे आहेत:

1. **निबंध स्पर्धा (Essay Competition):**
- **विषय:** 1. "शुद्ध मतदार यादीचे महत्त्व" 2. "मतदानाचे महत्त्व"

2. **प्रश्नमंजुषा स्पर्धा (Quiz Competition):**
- **विषय:** मतदार यादी, EVM-VVPAT, मतदान व मतमोजणी प्रक्रिया.

3. **निवड प्रक्रिया आणि वेळापत्रक**

स्तर (Level)	आयोजन अधिकारी	सहभागी विद्यार्थी	पुढील फररीत निवड
1. संस्था स्तर (2-7 नोव्हेंबर)	समन्वयक, निवडणूक साक्षरता क्लब (ELC)	शाळा / कॉलेजमधील सर्व इच्छुक विद्यार्थी	प्रत्येक स्पर्धेतून सर्वोत्कृष्ट 2 विद्यार्थी
2. विधानसभा मतदारसंघ स्तर (AC) (10-13 नोव्हेंबर)	मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कार्यालय	संस्था स्तरावरून निवडलेले विद्यार्थी (प्रत्येक संस्थेतून 2)	प्रति विधानसभा मतदारसंघ सर्वोत्कृष्ट 10 विद्यार्थी
3. जिल्हा स्तर (अंतिम) (16-18 नोव्हेंबर)	जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (DEO) कार्यालय	सर्व AC मधून निवडलेले विद्यार्थी (प्रत्येक AC मधून 10)	जिल्ह्याचे अंतिम 10 विजेते

Ka. Mamidha 12/11

गडचिरोली शिक्षण विभाग 1589 दिनांक 12.11.2026

12/11

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

तरी, संदर्भाधीन पत्रातील निर्देशांचे काटेकोर पालन करून आपल्या स्तरावरून विहित कालमर्यादेत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

सहपत्र : संदर्भीय पत्रांच्या प्रत.

(वसुमना पंत)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, चंद्रपूर

प्रत : **माहितीस्तव सविनय सादर.**

1. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.

Scanned with OKEN Scanner

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
दूरध्वनी क्रमांक :-०२२-२२८५६६६२, ई-मेल:-sveep-election@mah.gov.in

क्र. ईएलसी-२०२६/प्र.क्र.५८/निवडणूक-५
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०००३२.
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०२६.

प्रति,

१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई
२) जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर
३) जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर
४) उर्वरित सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी

विषय: - २ नोव्हेंबर २०२६ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) द्वारे निबंध आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्याबाबत.

संदर्भ:- भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ४९१/SVEEP-I/ELC-Comp/२०२६, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन पत्रान्वये भावी व नवमतदारांमध्ये निवडणूका व मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमधील Electoral Literacy Clubs (ELCs) द्वारे निबंध स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर पत्र दिनांक ३०.१०.२०२६ ची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या उक्त पत्रामधील तपशील थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

१. स्पर्धेचे स्वरूप व विषय

- **(अ) निबंध स्पर्धा (Essay Competition):**
  - विषय:- १. "शुद्ध मतदार यादीचे महत्त्व" (Importance of Pure Electoral Roll)
    २. "मतदानाचे महत्त्व" (Importance of Voting)
  - शब्दमर्यादा: शाळा स्तर ELC: ५००-८०० शब्द;
    कॉलेज स्तर ELC: ८००-१२०० शब्द.
  - भाषा: इंग्रजी, हिंदी किंवा मराठी.
  - AC आणि जिल्हा स्तरावर निबंध स्पर्धा ऑन द स्पॉट (Spot Writing - ६० मिनिटे) घेतली जाईल.

Scanned with OKEN Scanner

- (ब) प्रश्नमंजुषा स्पर्धा (Quiz Competition):
  - विषय: मतदार यादी, EVM-VVPAT, मतदान व मतमोजणी प्रक्रिया.
  - स्वरूप: लिखित (MCQ) किंवा थेट क्विझ स्वरूपात आयोजन केले जावे.

२. त्रिस्तरीय निवड प्रक्रिया आणि वेळापत्रक

स्तर (Level)	आयोजन अधिकारी	सहभागी विद्यार्थी	पुढील फेरीत निवड
१. संस्था स्तर (२-७ नोव्हेंबर)	समन्वयक, निवडणूक साक्षरता क्लब (ELC)	शाळा/कॉलेजमधील सर्व इच्छुक विद्यार्थी	प्रत्येक स्पर्धेतून सर्वोत्कृष्ट २ विद्यार्थी
२. विधानसभा मतदारसंघ स्तर (AC) (१०-१३ नोव्हेंबर)	मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कार्यालय	संस्था स्तरावरून निवडलेले विद्यार्थी (प्रत्येक संस्थेतून २)	प्रति विधानसभा मतदारसंघ सर्वोत्कृष्ट १० विद्यार्थी
३. जिल्हा स्तर (अंतिम) (१६-१८ नोव्हेंबर)	जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (DEO) कार्यालय	सर्व AC मधून निवडलेले विद्यार्थी (प्रत्येक AC मधून १०)	जिल्ह्याचे अंतिम १० विजेते

३. प्रमाणपत्रे, प्रसिद्धी व अहवाल

- **प्रमाणपत्रे:** जिल्हा स्तरावरील १० विजेत्यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (DEO) कडून गुणवत्ता प्रमाणपत्र, विधानसभा मतदारसंघ स्तरावरील विजेत्यांना मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कडून प्रमाणपत्र आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांना निवडणूक साक्षरता क्लब (ELC) कडून सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात यावे.
- **प्रसिद्धी:** स्पर्धेची छायाचित्रे व व्हिडिओ #ELCCompetition२०२६ हा हॅशटॅग वापरून व @ECISVEEP ला टॅग करून सोशल मीडियावर प्रसिद्ध करावेत.
- **अहवाल सादर करणे:** जिल्हा स्तरावरील अंतिम निकाल आणि अनुपालन अहवाल (Annexure-II च्या नमुन्यात) दिनांक २७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत भारत निवडणूक आयोगास सादर करावयाचा असल्यामुळे दिनांक २० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावा.

३. तरी, भारत निवडणूक आयोगाच्या संदर्भाधिन पत्रातील उपरोक्त निर्देशांस अनुसरून आपल्या स्तरावरून तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल विहीत कालावधीत या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

आपला,

(विक्रम वि. निकम)
अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

सोबत:- वरीलप्रमाणे

प्रत :- उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हानिवडणूक अधिकारी (सर्व) यांना आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

Scanned with OKEN Scanner